**पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष,**
**गुन्हे शाखा, बृहन्मुंबई यांचे कार्यालय**

**-: प्रेस नोट :-** दिनांक - १६/०८/२०२४

**मुंबई उपनगरातील साकिनाका परिसरात 'गांजा' ची तस्करी करणाऱ्या आरोपीतास जेरबंद करुन एकुन ४७ किलो 'गांजा' हा अंमली पदार्थ जप्त.**

| | | |
|---|---|---|
| **गु.र.क्र. व कलम** | :- | गु.र.क्र. ४४/२०२४, कलम ८ (क) सह २०(क) एन.डी.पी.एस.कायदा १९८५ |
| **दाखल दिनांक** | :- | दिनांक १५/०८/२०२४ रोजी २०.३० वा. |
| **गुन्हयाचे घटनास्थळ** | :- | साकिनाका, मुंबई. |
| **आरोपी** | :- | एक पुरुष, वय-२६ वर्षे |
| **जप्त मुद्देमाल व अंदाजे किंमत** | :- | १) ४७ किलो पेक्षा जास्त वजनाचा 'गांजा' हा अंमली पदार्थ<br>२) एक वॉक्स्वॉगन कंपणीची मोटर कार व एक मोबाईल<br>(एकुन किंमत अंदाजे रु. ३३.९८ लाख.) |

दिनांक १५/०८/२०२४ रोजी अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे बांद्रा युनिटने मुंबई शहरात प्रभावीपणे गस्त करत असताना साकिनाका, मुंबई परिसरात एक संशयीत इसम त्याचे कारसह मिळुन आला, त्यास अटकाव करुन त्याचे व त्याचे कारचे झडतीमध्ये त्याचे वॉक्सवॅगन कारमधील डिक्कीमध्ये एकुन ४७ किलो पेक्षा जास्त वजनाचा 'गांजा' हा अंमली पदार्थ मिळुन आल्याने त्याचे विरुद्ध अं.प.वि.कक्ष बांद्रा युनिट गु.र.क्र. ४४/२०२४, कलम ८(क) सह २०(क) एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात येवुन त्यास दिनांक १५/०८/२०२४ रोजी अटक करण्यात आली आहे.

अशा प्रकारे बांद्रा युनिटने प्रभावीपणे कारवाई करुन नमुद अटक आरोपीताने अवैधपणे विक्री करीता आणलेला ४७ किलो पेक्षा जास्त वजनाचा 'गांजा' हा अंमली पदार्थ त्याचे कारसह **एकुण अं.किं.रु. ३३,९८,०००/- किंमतीचा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे.**

सदरची यशस्वी कामगिरी ही श्री. विवेक फणसळकर, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री. देवेन भारती, विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री.लखमी गौतम, पोलीस सह आयुक्त(गुन्हे), श्री. शशि कुमार मीना, अपर पोलीस आयुक्त(गुन्हे), श्री. शाम घुगे, पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई, श्री. राजेंद्र शिरतोडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्ष (गुन्हे शाखा) अंतर्गत बांद्रा युनिटचे प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. संजय चव्हाण, यांचे नेतृत्वाखाली पो.नि. नितीन केराम, सपोनि. श्रीकांत कारकर व बांद्रा युनिट पोलीस पथक यांनी केली आहे.

----ooo----

